# ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ
ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು–560003

# KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD
Malleshwaram, Bengaluru-560003

## ಎಸ್.ಎಸ್.ಎಲ್.ಸಿ. ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆಪತ್ರಿಕೆ 2022–23
ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

**Subject : First Language — MARATHI**

ಸಮಯ: 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷಗಳು
ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100

ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : **08-M**

**Code No. : 08-M**

CCE-RF

ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿಗಳಿಗೆ

---

**विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :**

1. प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारचे 45 प्रश्न आहेत.
2. प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील ( बंद ) करण्यात आली आहे. परीक्षा सुरू झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.
3. बहुपर्यायी, वस्तुनिष्ठ, लघुत्तरी आणि दीर्घोत्तरी प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांचे पालन करा.
4. उजव्या बाजूच्या कडेला ( काठावर ) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.
5. पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

**I. पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा :** **6 × 1 = 6**

1. 'निरंतर' या संधीचा विग्रह या प्रमाणे होतो –

(अ) निर + अंतर (ब) नि + तर

(क) निरं + तर (ड) निः + अंतर

2. "मंदिराचा कळस मोठा आहे." अधोरेखित शब्दाची विभक्ती ही आहे –

(अ) द्वितीया (ब) चतुर्थी

(क) षष्ठी (ड) संबोधन

3. 'मांजराने उंदरास पकडले.' या वाक्यात हा प्रयोग आहे –

(अ) कर्तरी प्रयोग (ब) भावे प्रयोग

(क) कर्मणी प्रयोग (ड) यापैकी नाही

4. "मी निबंध लिहिला असेन." या वाक्यात हा काळ आहे –

(अ) पूर्ण वर्तमानकाळ (ब) पूर्ण भूतकाळ

(क) पूर्ण भविष्यकाळ (ड) रीती भूतकाळ

5. 'आपलाच नातेवाईक आपले नुकसान करतो' या आशयाची म्हण कोणती ?

(अ) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ

(ब) घरोघरी मातीच्या चुली

(क) आयत्या बिळावर नागोबा

(ड) एक घाव दोन तुकडे

6. 'चुलत सासरा' हे या समासाचे उदाहरण आहे –

(अ) द्विगू समास (ब) द्वंद्व समास

(क) बहुव्रीही समास (ड) मध्यमपदलोपी समास

**II.** **पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :** **4 × 1 = 4**

7. भाषण ऐकणारा : श्रोता : : पायापासून डोक्यापर्यंत : ...............

8. साक्षर : निरक्षर : : औरस : .............

9. नृप : राजा : : हात : .................

10. आणि : उभयान्वयी अव्यय : : हुशार : .......................

**III.** **पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :** **7 × 1 = 7**

11. लघुनिबंधाचे जनक कोण ?

12. धाकट्या मुलानं तात्यांच्या जमिनीचा कोणत्या शब्दात उल्लेख केला ?

13. उत्तम कांबळे यांच्या आईचे नाव काय होते ?

14. पहाटेच्या वेळी दारी कोण उभा आहे ?

15. 'नेनंता गुराखी' या कवितेचा काव्यप्रकार कोणता आहे ?

16. दुःखाची ज्योत कशी तेजाळते ?

17. विंदा करंदीकर यांचे पूर्ण नाव काय ?

**IV. खालील प्रश्नांची उत्तरे सूचनेप्रमाणे लिहा :** **3 × 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अ) इतिश्री होणे ब) 'ग' ची बाधा होणे.

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

"ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू"

20. गण पाडून वृत्त ओळखा.

"फेकी रसाळ तरुही मधुगंध पाश"

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **7 × 2 = 14**

21. "जात्यंध हस्तीते पाहो गेले" ससंदर्भ स्पष्ट करा.

22. 'अनंत काणेकर' यांचा परिचय लिहा.

23. राखीने दिलेले झाड का वाढत नव्हते ?

24. वाटणीच्या घोळाने घरात काय घडत होते ?

25. "ही बार बार तलवार येईल का पुन्हा" ससंदर्भ स्पष्ट करा.

26. कवी कुसुमाग्रज यांचा थोडक्यात परिचय लिहा.

27. गुराख्याच्या जीवाची आग का होते ?

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा : $1 \times 3 = 3$**

28. अ) स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी

ब) ग्रंथ माझे गुरु.

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच-सहा वाक्यात लिहा : $10 \times 3 = 30$**

29. माणकर, आंजूरकर, मोरे सरदारांनी काय केले ?

30. 'शील' या गुणाबद्दल आंबेडकर काय म्हणतात ?

31. लेखकाच्या घरी काकूंचे आगमन कसे झाले ?

32. 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

33. बेळगावी काँग्रेसमधील घटनांचे वर्णन करा.

34. शकुन सांगण्यासाठी ज्ञानेश्वर कावळ्यास कोणत्या गोष्टी देऊ करतात ?

35. श्रीकृष्णाची प्राप्ती न झाल्यास रुक्मिणी काय करणार आहे ?

36. पाहुणे कसे निगरगट्ट आहेत. ते स्पष्ट करा.

37. मार्कंडेयाची तुलना कवीने देशभक्तांशी का केली आहे ?

38. 'धरण' कवितेतील स्त्रीच्या परिस्थितीचे वर्णन करा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ-दहा वाक्यात लिहा :** **$4 \times 4 = 16$**

39. डॉक्टरांनी शिबिरामध्ये कोणकोणत्या गोष्टींची माहिती दिली.

**किंवा**

डॉक्टरांनी घेतलेल्या शिबिराचा अदृश्य परिणाम कोणता ?

[ Turn over

40. टिटवं घेऊन जाताना सावित्रीबाईंना कोणत्या गोष्टी आठवत होत्या ?

**किंवा**

सावित्रीबाईंना शिक्षिका म्हणून शाळेत जाताना कोणत्या गोष्टींचा सामना करावा लागला ?

41. भारत कशाप्रकारे असावा अशी संत तुकडोजींनी अपेक्षा केली आहे ?

42. खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :

त्या काळी ........................................

............................................ ललकार

.......................................................

...................................... हिरवे कौतुक

**किंवा**

लाल मातीचा ………………………………

……………………………………… अत्तर

…………………………………………………

……………………………आज असे सत्कार.

**IX. खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा :** **1 × 4 = 4**

43. खाण्यापिण्याचे पदार्थ उत्पन्न करून देवाने मनुष्य आणि जनावरे यांना एकदमच पृथ्वीच्या पाठीवर सोडून दिले. दोघेही प्रथम सारख्या स्थितीतच होते. परंतु मनुष्याच्या अंगात दूरदर्शीपणाचा गुण असल्यामुळे दोघांच्या स्थितीत आजमितीला किती फरक पडला आहे पाहा ! रानात जोपर्यंत गवत आहे; तोपर्यंत सगळ्यांची पोटे सारखी भरतात आणि जोपर्यंत नदीत पाणी आहे तोपर्यंत सगळ्यांची तृष्णा एकसारखीच शांत होत आहे. जनावरांत एक श्रीमंत जनावर, दुसरे दरिद्री जनावर

[ Turn over

असा भेद नाही. त्यांच्यात भिक्षा मागण्याची चाल नाही, एकाने दुसऱ्याच्या दारापुढे जाऊन मी उपाशी मरतो आहे, असे रडगाणे गाण्याचा या जनावरांना कधीही प्रसंग आलेला नाही आणि भविष्यात येणारही नाही.

**प्रश्न :**

अ) कशामुळे मनुष्य आणि जनावरांच्या स्थितीत फरक पडला आहे ? 2

ब) जनावरांवर कोणता प्रसंग आलेला नाही ? 2

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा : 1 × 5 = 5**

44. तुमच्या परिसरातील कचऱ्याचे ढीग हलविण्यासाठी ग्रामपंचायतीला विनंती अर्ज करा.

**किंवा**

तुमचा मित्र शालान्त परीक्षेत गुणवत्ता यादीत आला आहे. त्याला अभिनंदनपर पत्र लिहून त्याचे कौतुक करा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा :**

**1 × 5 = 5**

45. अ) भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव

ब) युवा पिढी आणि वाढती व्यसनाधीनता.